आरोग्य सेवक ( महिला ) व आरोग्य सहायक ( महिला ) या पदनामाचे नविन संवर्ग निर्माण करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय, क्र. एनयुआर १०९०/२०५ /प्र.क्र. ४८/९ /सेवा -६
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक २१ सप्टेंबर १९९३

शासन निर्णय :- बहुउददृशिय आरोग्य सेवा योजना पुरुष कर्मचा-यांना लागू करुन त्यानुसार पुरुष कर्मचा-यांच्या पदनामात बदल करण्यांत आला. याच अधिकारावर प्राथमिक आरोग्य केंद्र / उपकेंद्र स्तरावरील महिला कर्मचा-यांच्या पदनामात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता,शासन आता असे आदेश देते की,- प्राथमिक आरोग्य केंद्र / उपकेंद्र स्तरावरील सहायक परिचारिका प्रसाविका या पदाचे पदनाम आरोग्य सेवक ( महिला ) व स्त्री आरोग्य अभ्यागता या पदाचे पदनाम आरोग्य सहायक ( महिला ) असे बदलण्यात यावे. वरील प्रमाणे बदल केलेल्या पदनामाच्या आरोग्य सेवक ( महिला ) या पदास रुपये १२००--१८०० व आरोग्य सहायक ( महिला ) या पदास रुपये १४००--२३०० ही वेतनश्रेणी लागू राहील.

२/- शासन असेही आदेश देते की, प्राथमिक आरोग्य केंद्र / उपकेंद्र स्तरावर असलेल्या " परिचारिका प्रसाविका " हा संवर्ग लुप्त संवर्ग ( डाईंग केडर ) म्हणून समजण्यांत यावा, सध्या परिचारिका प्रसाविका ही पदे धारण करणा-या व्यक्ती सेवेत असे पर्यन्त या पदाचे सध्या चे पदनाम चालू ठेवण्यात यावे. त्यानंतर सध्याच्या परिचारिका प्रसाविका या पदावर काम करणारे संबंधीत कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यावर अथवा ही पदे अन्य कोणत्याही कारणांनी रिक्त झाल्यावर हया रिक्त पदांचे पदनाम बदलण्यात यावे व ते आरोग्य सहायक ( महिला ) असे करण्यांत यावे.

३/- नव्याने निर्माण करण्यांत आलेल्या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कारवाई ग्रामविकास विभागामार्फत करण्यांत येईल तो पर्यंत आरोग्य सेवक ( महिला ) ही पदे सहायक परिचारिका प्रसाविकांच्या पदासाठी विहित करण्यांत आलेल्या सेवा प्रवेश नियमातील तरतूदींनुसार भरावीत. तसेच आरोग्य सहायक ( महिला ) ही पदे महिला आरोग्य अभ्यागता साठी विहित करण्यांत आलेल्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार भरण्यांत यावीत.

वरील प्रमाणे पदनामाच्या बदलानुसार सेवा प्रवेश नियमात आवश्यक त्या सुधारणा करण्याची कार्यवाही ग्राम विकास विभागाने तात्काळ करावी.

४/- हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

५/- हा शासन निर्णय ग्राम विकास विभाग, सामान्य प्रशासन विभाग, व वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

सही /- xxx
( श.शा. आणावकर )
महाराष्ट्र शासनाचे सहसचिव.

प्रति,

संचालक आरोग्य सेवा, मुंबई.
अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा-कुटूंब कल्याण पुणे
सर्व सहसंचालक , आरोग्यसेवा
सर्व कार्यक्रम प्रमुख आरोग्य सेवा
सर्व उपसंचालक ,आरोग्य सेवा मंडळ प्रमुख
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व जिल्हा आरोग्याधिकारी, जिल्हा परिषद
ग्रामविकास व जलसंधारण विभाग / १३ मंत्रालय मुंबई
सर्व कार्यासन अधिकारी सार्वजनिक आरोग्य विभाग ,
सामान्य प्रशासन विभाग , मंत्रालय मुंबई
वित्त विभाग , मंत्रालय मुंबई
महालेखाकार , महाराष्ट्र १/२ ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा ) मुंबई / नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
निवड नस्ती ( सेवा -६ ) सार्वजनिक आरोग्य विभाग .